# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/५५/२०१४-१५/२०८ दिनांक : १६.१०.२०१४

## <u>आदेश केस क्र. ५५/१४-१५</u>

१) श्री.संगाप्पा लक्ष्मण बिराजदार,
मु.पो. मुचंडी, ता. जत,
जिल्हा - सांगली

\- अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता, - पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ

३) उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, संख.

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**
**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. संगाप्पा लक्ष्मण बिराजदार, मु.पो. मुचंडी, ता. जत, जि. सांगली यांनी आपले प्रतिनिधी श्री. हरीभाऊ खापरे यांचेमार्फत दि. २६.०८.२०१४ ला तक्रार दाखल केली. तक्रारदाराने मुचंडी, ता. जत येथील शेतीपंपासाठी ३ अश्वशक्ती वीज पुरवठ्यासाठी चलन रु. १५३३/- दि. ०९.०६.२०११ रोजी भरले आहे.

वितरण कंपनीने दिलेल्या चलनात सर्व्हीस कनेक्शन असे नमूद केले आहे मात्र प्रत्यक्षात डांब लागतात. त्यासाठी ग्राहकाने दि. २९.०५.२०१२ रोजी वि.प.कडे अर्ज दिला आहे. वि.प.ने डांब टाकून सुरक्षित वीज पुरवठा देणार आहे तो पर्यंत मीटर बसवा व वीज पुरवठा घ्या असे सांगितल्याचे नमूद केले आहे. ग्राहकास मीटर क्र. ५५०८३६९ देणेत आलेले आहे, बीले चालू झालेली आहेत, परंतु सुरक्षित वीज पुरवठा मिळालेला नाही. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. ०५.०४.२०१४ ला तक्रार दाखल केली, त्याची सुनावणी दि. ०३.०५.२०१४ रोजी सुनावणी झाली परंतु आदेश आजतागायत पारीत झालेला नाही. त्याच्या नाराजीने ग्राहकाने मंचाकडे अपील दाखल केले. मंचाकडून अपेक्षित मदत - मंच निश्चित करेल अशा मुदतीत ग्राहकास सुरक्षित वीज जोडणी देणेचा आदेश व्हावा.

वितरण कंपनीने आपल्या दि. १७.०९.२०१४ च्या लेखी अहवालात अंतर्गत कक्षाने दि. ०२.०६.२०१४ रोजी आदेश पारीत केला असून त्यानुसार कार्यवाही सुरु केली आहे. ग्राहकास सुरक्षित विद्युत वाहिनी उभी करुन देण्यात येईल असे म्हटले आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. ०८.१०.२०१४ रोजी घेतली असता, ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वितरण कंपनीतर्फे श्री. एम.आर. सगरे, उप कार्यकारी अभियंता, (चार्ज संख शाखा कार्यालय) उपस्थित. श्री. खापरे यांनी वि.प.ने ग्राहकास डांब टाकून सुरक्षित विद्युत वाहिनी उभी करुन एका निश्चित कालावधीत विद्युत पुरवठा करावा असे आदेश द्यावेत अशी मागणी केली. वि.प.चे प्रभारी संख शाखा कार्यालय अभियंता यांनी मंचासमोर सादर केलेल्या आपल्या लेखी अहवालात ग्राहकास ०.४२ कि.मी. लघुदाब वाहिनी उभी करण्यात आली असून सदर ग्राहकास दि. २६.०९.२०१४ रोजी सुरक्षित विद्युत पुरवठा जोडून देण्यात आला आहे. ग्राहक प्रतिनिधी यांना या अहवालाची सत्यता पडताळून पाहून मंचास कांही त्रुटी असल्यास कळविण्यासाठी मुदत देण्यात आली, कारण वि.प.ने ग्राहकाच्या कनेक्शनसाठी सुरक्षित विद्युत वाहिनी उभी केली असल्याबाबत इतर कुठलीही कागदपत्रे मंचासमोर दिली नाहीत. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) वितरण कंपनीच्या दि. ०८.१०.२०१४ च्या लेखी अहवालानुसार ग्राहकास दि. २६.०९.२०१४ रोजी ०.४२ कि.मी. लघुदाब विद्युत वाहिनी उभी करुन विद्युत पुरवठा दिला असल्याने तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-
(बी.जी. पवार)
अध्यक्ष

जी. सी. लेले, सदस्य .. सही/-

जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.